महाराष्ट्र नागरी (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम 1981 च्या नियम 38 नुसार शासकीय कर्मचा–यांनी जन्म तारीख नोंदविताना विचारात घ्यावयाचे दस्तऐवज.

---

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्र.जन्मदि.–1092/प्र.क्र.62/92/(2)/13–ब

मंत्रालय मुंबई 400032 दिनांक 27 सप्टेंबर 1994

**परिपत्रक**

शासकीय कर्मचा–याने सेवा प्रवेश केल्यानंतर सेवापुस्तिकेत जन्मतारीख नोंदविताना कोणती जन्मतारीख नोंदविण्यात यावी याबाबतची तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या नियम 38(2) मध्ये केली आहे. या नियमानुसार जन्मदिनांक कागदोपत्री पुराव्यावरुन पडताळून पाहण्यात यावा अशी तरतूद आहे. नियम 38 खालील सूचना क्रमांक 2 मध्ये अचूक जन्मतारीख नोंदविण्यासाठी कोणती कागदपत्रे ग्राह्य मानावी हे स्पष्ट करण्यात आले आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन्मतारीख नोंदविताना कागदोपत्री पुरावा लक्षात घेताना सूचना क्रमांक 2 मधील पुरावे लक्षात न घेता शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा शालांत परीक्षा प्रमाणपत्रात नोंदविलेली जन्मतारीख लक्षात घेऊन सेवा पुस्तकात ती नोंदविण्यात येते. अशी कार्यवाही नियमास विसंगत आहे.

नियम 38(2) खाली सूचना 2 मध्ये जन्मतारखेसंबंधीचे पुरावे तपासण्याबाबत नमूद केले आहे. त्यामध्ये जन्ममृत्यु नोंदवहीत कर्मचा–यांच्या नावाचा उल्लेख असेल असा पुरावा नियमानुसार ग्राह्य आहे. ही तरतूद लक्षात घेता अधिका–याने/कर्मचा–याने सेवा प्रवेश केल्यावर सेवापुस्तिकेत जन्मदिनांकाची नोंद करताना फक्त शाळा सोडल्याचा दाखल्याचा किंवा शालांत परीक्षा प्रमाणपत्राचा आधार घेऊन जन्मतारीख निश्चित न करता जन्म–मृत्यु नोंदवहीतील उतारा/जन्माचा दाखला घेण्यात यावा. जन्म–मृत्यु नोंदवहीत नावाचा उल्लेख असेल व शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, शालांत परीक्षा प्रमाणपत्र व जन्म–मृत्यु नोंदवहीतील जन्मदिनांक हा जर भिन्न असेल तर जन्म मृत्यु नोंदवहीतील जन्मदिनांक ग्राह्य मानणे आवश्यक आहे व तो सेवापुस्तकात नमूद करणेही आवश्यक आहे. ज्या अधिका–याकडे/कर्मचा–यांकडे जन्म–मृत्यु नोंदवहीतील उतारा/दाखला उपलब्ध नसेल त्यांच्या बाबतीत शाळा सोडल्याचा दाखला, शालांत परीक्षा प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य मानणे आवश्यक आहे. परंतु अशा कर्मचा–यांना भविष्यात जन्मतारीख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही याची स्पष्ट कल्पना देण्यात यावी.

सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख व पर्यवेक्षीय अधिका–यांनी त्यांच्या नियमित तपासणीच्यावेळी सेवापुस्तिकेत नोंदविलेल्या जन्मतारखेच्या नोंदी देखील नियमानुसार केल्या आहेत/नाही याची तपासणी करावी व चुकीच्या जन्मदिनांकाच्या नोंदी असल्या तर त्या दुरुस्त करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिका–यांना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

अ.म.मंडपे

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्य मंत्री यांचे सचिव

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक

* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई

* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई

* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त
मुख्य लेखा परीक्षक, निवासी लेखे, कोकण विभाग, नवी मुंबई
संचालक, लेखा व कोषागरे मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
ग्राम विकास विभाग/नगर विकास विभाग/वित्त विभाग (से 2)/मंत्रालयाचे इतर सर्व विभाग.
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
निवड नस्ती.